मंगळवार, दि. ९ सप्टेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 | yuva.aadarsh@gmail.com | 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ | https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ | https://twitter.com/Yuva_aadarshjln/ | RNI: MAHMAR/2019/78282

### जिल्हा वार्षिक योजना आढावा बैठक संपन्न
## निधी अखर्चित राहिल्यास संबंधित विभाग प्रमुखाला जबाबदार धरणार - जिल्हाधिकारी




**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्याच्या विकासासाठी जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत मंजूर निधी सर्व विभागांनी वेळेत पूर्ण खर्च करावा. एकही पैसा परत जाता कामा नये. निधी अखर्चित राहिल्यास संबंधित विभागप्रमुखाला जबाबदार धरण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी बैठकीत दिले.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२५-२६ आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात घेण्यात आली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कोमल कोरे, जिल्हा नियोजन अधिकारी यांच्यासह संबंधित यंत्रणेचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाल्या की, यंत्रेणेने जिल्हा नियोजन समितीच्या निधीचा चांगला वापर करणे गरजेचे आहे. काम झालेल्या ठिकाणांचे जिओ टॅगींग छायाचित्रे सादर करावेत. काम अपूर्ण राहिले असल्यास त्याची इत्यंभूत माहिती घेवून बैठकीस हजर राहणे आवश्यक आहे. निधी दिल्यानंतर वेळेत निधी खर्च व्हायला पाहिजे. निधी परत जाणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच काम करण्यासाठी नेहमी उत्साही रहावे. तसेच चुकीची कामे अजिबात खपवून घेतली जाणार नाहीत त्यामुळे नियमानूसार कामे वेळेत करावी अशा सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी सन २०२४-२५ खर्चाचा आढावा, सन २०२५-२६ नियोजनाबाबत, अखर्चित निधीबाबत माहिती, स्पिल कामांच्या याद्या व आवश्यक निधी , सन २०२४-२५ पर्यंत प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्र याचा आढावा घेण्यात आला. यावेळी आता प्रत्येक कामांना युनिक आयडी देण्यात येणार असल्याचेही नियोजन विभागाकडून सांगण्यात आले.

# महावीर चौकात हिरवा झेंडा; जैन समाजामध्ये संतापाची लाट

### प्रशासनाला निवेदन, तातडीने हटविला हिरवा झेंडा

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील ऐतिहासिक आणि धार्मिक दृष्ट्या महत्त्वाच्या महावीर चौकात हिरवा झेंडा लावण्यात आल्याने जैन समाजामध्ये तीव्र संताप व्यक्त झाला आहे. महावीर चौक हा जैन समाजासाठी धार्मिक व ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा ठिकाण असून, येथे भगवान महावीर स्वामी यांचे स्मृतीचिन्ह आहे. या धार्मिक स्थळावर अशा प्रकारची अनधिकृत कृती झाल्यामुळे समाजाच्या धार्मिक भावना गंभीरपणे दुखावल्या गेल्या आहेत.

यासंदर्भात जैन समाजाच्या वतीने जालना महानगरपालिका आयुक्त, मा. पोलीस निरीक्षक, सदर बाजार पोलीस स्टेशन तसेच मा. पोलीस अधीक्षक जालना यांना स्वतंत्र निवेदने सादर करण्यात आली आहेत. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दि.७ सप्टेंबर रोजी महावीर चौक परिसरात हिरवा झेंडा लावलेला आढळून आला आणि हा प्रकार शहरातील शांतता, सुव्यवस्था व सामाजिक ऐक्य बिघडविण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न असल्याचे स्पष्ट दिसून येते.

सकल जैन समाज सेवा व सकल हिंदू समाजाच्या वतीने बोलताना अक्षय गोरंट्याल म्हणाले, अलीकडेच आमच्या महावीर भगवान यांच्या स्मारक सेवा पुतळा चौकात चुकीची घटना घडली. त्या ठिकाणी हिरवा झेंडा लावण्यात आला होता. तो आम्ही काढून टाकला असून, समाज व सकल हिंदू समाजाने गोमूत्राने पूर्ण परिसराची स्वच्छता करून पुन्हा आमचा झेंडा लावला आहे. यापूर्वीच आम्ही सदर बाजार पोलीस स्टेशनमध्ये तक्रार व अनेक निवेदनं दिली होती. आता या घटनेनंतर आम्ही महापालिकेतही निवेदन देणार आहोत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून पुरावे मिळतील आणि त्यावर योग्य कारवाई व्हावी, अशी आमची अपेक्षा आहे. पोलिसांना आमची एकच विनंती आहे की अशा घटना सतत घडू नयेत. मागील १ तारखेलाही अशीच घटना घडली होती. त्या वेळी तत्पर कारवाई केल्याबद्दल आम्ही पोलीस प्रशासनाचे आभार मानतो. मात्र फक्त सात दिवसांत पुन्हा दुसरी घटना घडली आहे. यावरून स्पष्ट होते की काही विपरीत बुद्धीचे लोक समाजात तेढ निर्माण करण्याचे काम करत आहेत. सकल हिंदू समाज व सकल जैन समाज शांततेने व संयमाने मार्ग काढत आहेत. मात्र तिसऱ्यांदा अशी घटना घडली तर आम्हालाही विचार करावा लागेल की आम्ही शांत राहावे की कठोर भूमिका घ्यावी. हे विपरीत बुद्धीचे लोक कोणत्यातरी संघटनांचे प्यादे असल्याचे दिसते. तरीही, आजपर्यंत आम्ही संयमाने मार्ग काढला आहे. पण पुन्हा अशी घटना घडली, तर आम्ही त्याचा तीव्र पान २ वर



युवा आदर्श

गुन्हा ...

कधी कळेलं महत्व
लाच देणे असे गुन्हा
एक चूक भले क्षम्य
प्रमाद तो पुन्हा पुन्हा
सिस्टिम दिरंगाईमुळे
सवय सामान्य जनां
देरे हरि खाटल्यावरी
आळस लुभावी मना
नाईलाज करे ईलाज
गोंधळू टाके सज्जना
दुर्लक्ष करु लागे लक्ष
मैदान मिळते दुर्जना
हेलपाटे रे क्लिष्टवाटे
जरा चिरीमिरी द्याना
साटेलोटे रे खरे खोटे
रोग बोकाळला जुना
मुक्त फिरे लाच खोरी
पुन्हांदा फुटतो पान्हा
लुटले तरी काम नाही
अगदी शेवटी ये भाना
निवांत बसले लढवैये
मग कोण करे सामना
सोडून देतोसहज सारे
असाचंआहे रे जमाना
होत नाही कधी काही
रे दिल्या घेतल्या विना
धोपट मार्ग अवलंबला
कशाला करायची दैना

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

## भाजपा जालना ग्रामीण ची सेवा पंधरवाडा निमित्त बुधवारी जिल्हा कार्यशाळा

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी जालना जिल्हा ग्रामीण ची लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर २०२५ दरम्यान सेवा पंधरवाडा निमित्त विविध कार्यक्रम आयोजीत करण्यासाठी बुधवार दिनांक १० /०९/ २०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता भाजपा कार्यालय,बदनापूर येथे भाजपा ग्रामीण जिल्हा कार्यकारिणी व मंडळ अध्यक्ष,जिल्हयातील भाजपाचे लोकप्रतिनिधी ,जि.प.सदस्य , प.स.सदस्य, न.प.सदस्य यांची एक दिवसीय कार्यशाळेस भाजपा मराठवाडा संघटन मंत्री संजयजी कौडगे हे मार्गदर्शन करणार असून भाजपा जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

भाजपा सेवा पंधरवाडा कार्यशाळेस भाजपा जालना ग्रामीण जिल्हा कार्यकारिणी, भाजपा मंडळ अध्यक्ष,सेवा पंधरवाडा जिल्हा व मंडळ समिती, भाजपाचे जिल्हयातील लोकप्रतिनिधी ,जि.प.सदस्य,प.स.सदस्य व न.प.सदस्य यांनी उपस्थितीत रहाण्याचे आवाहन भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायणराव कुचे यांनी केले आहे.

## आयटकच्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा जिल्हा परिषदेवर मोर्चा

**जालना । प्रतिनिधी -** अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांची पूर्तता करण्याच्या मागणीसाठी आयटकच्या अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी सोमवारी( दि. ८)जालना जिल्हा परिषदेवर मोर्चा काढून जिल्हा परिषद परिसर दणाणून सोडला.

आयटक प्रणित महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष देवीदास जिगे, कृष्णा वाहुळे,गजानन तळेकर, दुर्गा टकले आदींच्या नेतृत्वाखाली अंबड चौफुलीवरून घोषणाबाजी करीत हा मोर्चा जिल्हा परिषदेवर धडकला.

यावेळी देविदास जिगे, कृष्णा वाहुळे, दुर्गा टकले आदींची भाषणे झाली. यावेळी जिगे म्हणाले की, राज्यभरामध्ये अंगणवाडी केंद्रामध्ये मुलांना शिकविण्याऐवजी अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामांचा बोजा देत असून गाव पातळीवर राज्य व केंद्र सरकारच्या विरूद्ध मध्ये रोष निर्माण होत आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना प्राथमिक पूर्व शिक्षणाऐवजी पान २ वर




# ३१ ग्रामपंचायतींच्या ग्रामसभेतील मुख्यालयीच्या कागदपत्रांवर पडदा!

### संभाजी ब्रिगेडचा १५ सप्टेंबरला रणसंग्राम

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा तालुक्यातील ३१ ग्रामपंचायतींमध्ये घेण्यात आलेल्या ग्रामसभांच्या कार्यवाहीशी संबंधित कागदपत्रांची मागणी वारंवार करूनही प्रशासनाने अद्याप ती माहिती उपलब्ध करून दिलेली नाही. यामुळे लोकशाहीची थेट फसवणूक होत असून भ्रष्टाचार झाकण्यासाठी अधिकारी व ग्राम सेवक संगनमताने काम करत असल्याचा गंभीर आरोप संभाजी ब्रिगेडचे तालुका अध्यक्ष शिवश्री बाळासाहेब खवणे यांनी केला आहे.

या संदर्भात दिनांक ४ जून, १० जून, १६ जून, २३ जून व २६ ऑगस्ट २०२५ रोजी पाच वेळा लेखी निवेदने दिली. तसेच प्रत्यक्ष भेटी देऊन मागणी केली, पण गटविकास अधिकाऱ्यांकडून आजवर कोणतेही उत्तर देण्यात आलेले नाही आणि दोषींवर कारवाईसुद्धा झालेली नाही.

कायदेशीर व लोकशाही संदर्भ देताना बाळासाहेब खवणे म्हणाले की, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार प्रत्येक ग्रामसभा अनिवार्य आहे व तिचे कार्यवृत्त सार्वजनिक करणे बंधनकारक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत ग्रामसभेची सर्व कागदपत्रे ही सार्वजनिक नोंद आहेत व ती माहिती जनतेला देणे प्रशासनाची जबाबदारी आहे. तरीदेखील, या जबाबदारीकडे दुर्लक्ष करून भ्रष्टाचाराचे जाळे जाणीवपूर्वक झाकले जात आहे.

**संभाजी ब्रिगेडच्या स्पष्ट मागण्या-**
३१ ग्रामपंचायतींच्या ग्रामसभांची कार्यवाही नोंद, उपस्थिती पत्रके, निर्णय नोंदी व संलग्न कागदपत्रे तातडीने सार्वजनिक करावीत. संबंधित ग्रामसेवक व अधिकाऱ्यांवर चौकशी पान २ वर

## अकोला देव परिसरात लांडग्याचा हल्ल्यात पाच शेळ्या ठार; शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण




**विशाल देशमुख**

**जाफ्राबाद -** लांडग्यांने केलेल्या हल्ल्यात पांच शेळ्या ठार झाल्याची घटना रविवारी पहाटेच्या सुमारास जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी जवळील अकोला देव येथे घडली.अकोला देव शिवारातील रविवारी सकाळी लंडग्याच्या कळपाने गोठ्यात शिरून पांच शेळ्यांचे लचके तोडून ठार केले याबाबत शेतकरी विठ्ठल कदम यांनी आपले काही शेतकरी मित्र आणि माजी जी.प.सदस्य दत्तू पंडित यांच्यामार्फत वन विभागाशी संपर्क साधला असता वनविभागाच्या अधिकाऱ्याने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.

या संदर्भात सविस्तर माहिती अशी की अकोला देव येथील विठ्ठल कदम हे अल्पभूधारक शेतकरी असून ते शेती सोबत गेल्या अनेक दिवसांपासून शेळीपालन करतात.शनिवारी रात्री ते नेहमीप्रमाणे शेळ्यांना गोठ्यात बांधून घरी गेले.रविवारी सकाळी शेतात गेले असतांना त्यांना गोठ्यातील शेळ्यांवर लांडग्याच्या कळपाने हल्ला केल्याचे दिसताच त्यांनी आरडाओरडा करून लाडग्यांना हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला मात्र तो पर्यंत या कळपाने ५ बकऱ्याचे पिल्लांचे लचके तोडून ठार केले होते. या बाबतीत वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडून घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला.

**आमदार दानवे कडून मदत मिळवून देणार -दत्तू पंडित**

गरीब व अल्पभूधारक शेतकरी विठ्ठल कदम यांनी मला घटलेली घटनेची माहिती देताच मी या वन परिमंडळ अधिकारी श्री योगेश डोमळे यांच्याशी तातडीने संपर्क साधत अधिकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला.या शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असल्याचे निदेशनास आले आहे. या बाबतीत आमदार संतोष दानवे यांच्या माध्यमातून संबंधित पीडित शेतकऱ्यांला पूर्णपणे नुकसान भरपाई मिळवून देणार असल्याचे माजी जिल्हा परिषद सदस्य दत्तू पंडित पान २ वर

## शनिवारी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांच्या निर्देशानूसार शनिवार दि.१३ सप्टेंबर २०२५ रोजी जालना येथील जिल्हा व सत्र न्यायालयात राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त लोकांना फायदा व्हावा या उद्देशाने लोक अदालतीबाबतची माहिती व प्रसिध्दी घरा-घरापर्यंत पोहचावी या उद्देशाने व लोकांनी जास्तीत जास्त प्रकरणे लोक न्यायालयाच्या माध्यमातून निकाली निघावे या हेतूने राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. लोक अदालतीमध्ये आपली जास्तीत जास्त प्रकरणे ठेवावी यासाठी विधिज्ञ, पक्षकार व शासनाच्या विविध विभागांनी -अधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश वर्षा मोहिते व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव करीम खान यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# संपादकीय

पान

## साक्षरतेचे प्रमाण वाढण्याची गरज

कालचा दिवस म्हणजे ८ सप्टेंबर हा दिवस संपूर्ण जगात जागतिक साक्षरता दिन म्हणून साजरा केला गेला. मानवी समाज सुसंस्कृत बनून समाजाचे शिक्षणाच्या जोरावर मानवी कल्याण होऊन सर्वांना विकासाच्या समान संधी उपलब्ध व्हाव्यात. ज्ञानी लोकांपासून अज्ञानी लोकांची होणारी पिळवणूक, फसवणूक, शोषण आदीपासून मुक्तता व्हावी. निरक्षर लोकांना साक्षरतेची संधी मिळावी यासाठी राष्ट्रकुलच्या 'युनेस्को' या संघटनेने १९६५ साली जागतिक पातळीवर साक्षरता दिन साजरा करण्याची घोषणा केली व त्याच्या पुढच्या वर्षापासून ८ सप्टेंबरला जगभर ती प्रथा रूढ झाली. आज इतक्या वर्षांनंतरही युनेस्कोने सुरू केलेल्या जागतिक साक्षरता दिनाला जगभर प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. युनेस्कोच्या व्याख्येनुसार साक्षरता म्हणजे माणसाला दैनिक जीवनाशी निगडित बाबीविषयी लिहिता वाचता येणे, मानवी जीवनातील घडामोडींचे विश्लेषण करता येणे व वैयक्तिक स्वातंत्र्य अबाधित ठेवून स्वतःच्या व समाजाच्या प्रगतीस हातभार लावणे. शिक्षणाचे महत्व कोणाला नाही? मानवी कल्याणासाठी शिक्षण अतिशय महत्वाचे आहे मात्र केवळ शिक्षण देणे म्हणजेच साक्षरता नव्हे तर मानवी प्रगतीच्या वाट्यात अडथळा बनण्याचा, गरिबीला नष्ट करण्याचा तो एक वैशिष्ट्यपूर्ण आणि शक्तिशाली मार्ग आहे. जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि समाज बदलवण्यासाठी साक्षरता एक परिणामकारक साधन आहे म्हणूनच युनेस्कोने जगभर साक्षरता अभियान राबवले. युनेस्कोने सुरू केलेल्या या साक्षरता अभियानाला जगभर चांगला प्रतिसाद मिळाला. भारतात सुद्धा या अभियानाचे चांगले फलित दिसून आले असून, एका आकडेवारीनुसार १९४७ साली भारत स्वातंत्र्य झाला तेंव्हा भारताचा साक्षरता दर हा १२ टक्के इतकाच होता. १९९१ मध्ये साक्षरतेचे हे प्रमाण ५२ टक्क्यांवर आले तर २०११ मध्ये ते ७५.०६ वर पोहचले. पण आपला देश अजूनही १०० टक्के साक्षर नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाली तरी १०० टक्के साक्षरता आपण साध्य करु शकलो नाही. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, ओडिशा, बिहार या उत्तरेकडील राज्यात अजूनही साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक नाही त्यामानाने केरळसह दक्षिणेकडील सर्व राज्यात मात्र साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक आहे. देशातील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी शासकीय पातळीवर विविध उपक्रम राबवले जात आहेत. सर्व शिक्षा अभियान, समग्र शिक्षा अभियान, मध्यान भोजन योजना, प्रौढ शिक्षण योजना, राजीव गांधी साक्षरता अभियान, नवभारत साक्षरता अभियान या सारखे उपक्रम राबवून सरकार देशातील साक्षरतेचा टक्का वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. या सर्व उपक्रमांना चांगला प्रतिसादही मिळत असल्याने लवकरच आपण १०० टक्के साक्षरतेचे उद्दिष्ट साध्य करू. जागतिक साक्षरता दिनाच्या आपल्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## आणीबाणी काळात कारावास भोगलेल्या व्यक्तींनी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना -** आणीबाणीच्या कालावधीत बंदिवास सोसाव्या लागलेल्या व्यक्तींचा सन्मान, यथोचित गौरव करण्याबाबतची योजना नव्याने सुरु करण्यात आली आहे. शासन निर्णयातील तरतूदीनुसार या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे नव्याने अर्ज सादर करण्याचा अंतिम २४ नोव्हेंबर २०२५ असा निश्चित करण्यात आला आहे. तरी आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेल्या व्यक्ती अथवा वारस पत्नी, पतीने आपला अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेली व्यक्ती दि. ०२/०१/२०१८ पुर्वी हयात नसल्यास त्यांच्या हयात जोडीदार पती, पत्नी केवळ अशा व्यक्तींनी अनुज्ञेय असलेले मानधन मिळण्याकरीता दि. २५सप्टेंबर २०२५ पर्यंत अर्ज दाखल करण्याची मुभा दि.२७/०६/२०२५ च्या शासन शासन निर्णयान्वये देण्यात आली होती. त्यानुसार अशा आणीबाणीधारकांच्या जोडीदारांनाही (पती/पत्नी) यांनी दि.२७/०६/२०२५ च्या शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ९० दिवसांची अर्ज दाखल करण्याची मुभा राहील. तरी पात्र आणीबाणीधारकांनी विहित मुदतीत जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे अर्ज सादर करावेत.

# खाकी वर्दीतला 'विघ्नहर्ता'!



मुंबईकरावर कुठले ही संकट घोगांवणार असेल तर पोलीस बांधव आपल्या छातीची ढाल पुढे करुन उभा राहतो. त्याच्यासाठी ऊन काय, वारा काय की पाऊस काय सगळे सारखेच.तो कसलीही तमा बाळगत नाही.पोलिसांना तर सण म्हणजे काय आणि तो आपल्या परिवारा सोबत साजरा कसा करतात हे सुद्धा बहुदा माहीत नसावे.कारण ऑन ड्युटी चौवीस तास मुंबई शहरात पहारा देणारे पोलीस घरी कमी ड्युटीवर हजर राहून आपले कर्तव्य बजावत असतात.

होळी,रंगपंचमी, दहिहंडी, १५ ऑगस्ट नंतर सगळ्यात मोठया प्रमाणात गणेशोत्सव मुबंईत साजरा केला जातो. या सणाला कुठलेही गाल बोट लागू नये म्हणून पोलीस डोळ्यात तेल घालून पहारा देत असतात.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या संख्येने पोलीस दल शहरात तैनात असतानाच मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने आंदोलक मुंबईत दाखल झाले. या पार्श्वभूमीवर पाच दिवस अहोरात्र सुरक्षेसाठी तैनात असलेल्या मुंबई पोलिसांनी संयम व दक्षता दाखवत संपूर्ण परिस्थिती नियंत्रणात ठेवली. न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करताना आझाद मैदान येथे कोणताही अनुचित प्रकार घडू नये याची पोलिसांनी काळजी घेतली.यासाठी त्यांच्या सुट्या रद्द करण्यात आल्या. घरी गणपती असून सुद्धा त्यांनी गणेश मंडळात कुठलीही गडबड होऊ नये म्हूणन दिवस रात्र पहारा दिला.

मुंबईतील सर्वांत मोठा आणि भव्य गणेशउत्सव आहे.या काळात मुंबईत लालबागसह अनेक परिसरात भाविक लाखोंच्या संख्येने गणपती पाहण्यासाठी येत असतात .तसेच विसर्जन काळात देखील मुंबईच्या चौपाट्यांवर मोठी गर्दी असते .या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कुठलाही अनुचित प्रकार घडू नये आणि उत्सव शांततेत पार पडावा .या पार्श्वभूमीवर मुंबईचे पोलिस सतर्क राहून आपले कर्तव्य पार पाडले.

जनतेच्या रक्षणासाठी दिवसरात्र इमाने इतबारे जागता पहारा ठेवणार्या पोलिस मित्रांशी लोक मात्र फारसा जवळचा संबंध ठेवतांना दिसत नाहीत. त्याच्याशी मैत्री नको आणि दुष्मनीही नको अशी सर्वसाधारण भावना! थोड्याथोडक्या चुकांना पोलिस शिक्षा करतो, दंड ठोकतो, म्हणून तो अप्रिय होतो बापडा.

जवळपासही नकोसे वाटणार्या अशा कर्तव्यकठोर पोलिसांच्या कामाचे फारसे कौतुक करताना दिसून येत नाही.

मुंबईकरांनी सुरक्षित आणि उत्साही वातावरणात सणांचा आनंद घ्यावा हा पोलिसांचा उद्देश असतो.यासाठी पोलिस सर्वतोपरी प्रयत्न करत असतात. म्हूणनच पोलिसांनी केलेल्या शौर्य, संवेदनशीलता, आणि समाजाप्रती केलेल्या धाडसी कृत्यांसाठी त्यांचे कौतुक करायला हवे.पोलिसांचे कौतुक केले जावे कारण ते कायदा व सुव्यवस्था राखतात, जनतेचे रक्षण करतात, गुन्हेगारी रोखतात आणि सार्वजनिक शांतता टिकवतात. पोलीस हे जनतेचे जनसेवक आहेत, जे आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि मदतीसाठी तत्पर असतात.

सणासुदीच्या काळात पोलीस हे गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी, आणि कोणत्याही अनुचित घटना टाळण्यासाठी विशेष बंदोबस्त ठेवतात. पोलिस सण, उत्सव निर्धोकपणे साजरे करण्यासाठी आपले कर्तव्य बजावतात, हे सुनिश्चित करतात की लोकांना कोणत्याही सुरक्षेच्या समस्येशिवाय आपल्या परंपरा आणि उत्सव साजरा करण्यासाठी मदत होते.

घरचा बाप्पा, घरची आरती, कौटुंबिक गोडवेळ या साऱ्यांचे बलिदान देत हे पोलिस रस्त्यावरच जणू 'विघ्नहर्ता' रूप घेऊन उभे होते.त्यामुळे पोलिसांना खाकी वर्दीतला 'विघ्नहर्ता'म्हटले तर वावगे ठरू नये.



**श्री दत्ता श्रावण खंदारे**
**धारावी, ९६९९३१३६२१**

## सेवानिवृतीच्या उंबरठ्यालगत 'टीईटी' ची सक्ती

# सक्तीच्या भक्तीत तरा, नाही तर घरचा रस्ता धरा

शालेय शिक्षणाची गुणवत्ता उंचावण्यासाठी भारत सरकार आणि राज्य सरकार गेल्या काही वर्षांपासून अनेक सुधारणा राबवत आहेत. शालेय शिक्षण विभागाने १३ फेब्रुवारी २०१३ रोजी आदेश काढून प्राथमिक शिक्षकांसाठी 'टीईटी' (शिक्षक पात्रता परीक्षा) बंधनकारक केली. मात्र, आता सर्वोच्च न्यायालयाने त्यापूर्वी नोकरीला लागलेल्या इयत्ता पहिली ते आठवीच्या वर्गांना शिकविणा-या शिक्षकांसाठी देखील 'टीईटी' चे बंधन घातले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार प्राथमिक शाळांवरील ज्या शिक्षकांचे वय ५३ वर्षे आहे, त्यांना २ वर्षात 'टीईटी' उत्तीर्ण व्हावीच लागणार आहे.




'टीईटी' परिक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय सेवेत राहू शकत नाही किंवा पदोन्नतीही मिळवू शकत नाही. अन्यथा सदर शिक्षकांना सेवानिवृत्ती स्वीकारावी लागेल. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी शिक्षकांची पात्रता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व शिक्षकांना 'टीईटी' उत्तीर्ण होणे अपरिहार्य आहे. मात्र, बालशिक्षण हक्क कायदा २००९ पूर्वी नियुक्त झालेले शिक्षक आणि पाच वर्षापेक्षा कमी सेवा शिल्लक असलेल्या शिक्षकांना टीईटीतून वगळले आहे. राज्यात ५३ वर्षावरील अंदाजे १ लाख ४९ हजार शिक्षक आहेत.

प्राथमिक शाळांवरील ५३ वर्षांपर्यंतच्या सर्वच शिक्षकांनी २ वर्षात 'टीईटी' उत्तीर्ण करावी, अन्यथा त्यांच्यावर सक्तीच्या सेवानिवृत्तीची कार्यवाही करावी, असेही आदेश आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे महाराष्ट्रच नव्हे, तर उत्तरप्रदेश, पश्चिम बंगालसह बहुतेक राज्य सरकारपुढे पेच निर्माण झाला आहे. शालेय शिक्षण विभागाने शासनाला सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे.

दुसरीकडे शिक्षकांमध्ये संभ्रम असून २५-३० वर्षांपासून शाळेत सेवा देणा-या आणि वयाची पन्नाशी पार केलेल्या शिक्षकांना ही परिस्थिती मोठी धक्का देणारी आहे. शिक्षकांच्या जीवनात निवृत्तीपूर्व काळ शांततेने घालवण्याचा असतो. पण आता ५३ वर्षे वय असलेल्या शिक्षकांसाठी 'टीईटी' मोठं आवाहन बनले आहे. त्यांच्या नातवंडांसोबतच त्यांनाही अभ्यास करून परीक्षा द्यावी लागेल, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शिवाय, शासनाने फक्त दोनच संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. राज्यात प्राथमिक शाळांची संख्या ६५ हजार ८० तर उच्च प्राथमिक शाळांची संख्या २२ हजार ३६० इतकी आहे. या शाळांवर सुमारे ४.७९ लाख शिक्षक असून त्यातील २०१३ पूर्वाच्या सर्व शिक्षकांना (ज्यांचे वय ५३ वर्षांपर्यंत आहे असे) देखील 'टीईटी' उत्तीर्ण व्हावी लागणार आहे. प्राथमिक शिक्षकांसाठी सर्वोच्च न्यायालयाने 'टीईटी' बंधनकारक असल्याचा निकाल दिला आहे. ११० पानांचा तो आदेश असून त्यावर अभ्यास करून शासनाकडून आदेश प्राप्त होतील. त्यानुसार कार्यवाही करण्यात येणार आहे. परंतु फेब्रुवारी २०१३ पूर्वीच्या शिक्षक सेवेत त्यांना ही अट व शर्त लागू नव्हती. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर महाराष्ट्र शासन आपले म्हणणे सादर करेल, असे वरिष्ठ अधिका-यांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशामुळे शिक्षकांची पदोन्नती आता 'टीईटी' वरच आहे. शिक्षण सेवकांना ३ वर्षानंतर उपशिक्षक म्हणून संधी मिळते. त्यानंर सहशिक्षक, पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक आणि पुढे देखील पदोन्नती मिळतात. पदोन्नतीच्या प्रत्येक टप्प्यावर 'टीईटी' ची अट घालण्यात आल्याने सेवाज्येष्ठ शिक्षकांऐवजी 'टीईटी' उत्तीर्ण असणारे ज्युनिअर शिक्षक मुख्याध्यापक होणार आहे. यामुळे शिक्षकांमध्ये अस्वस्थता आणि नाराजी आहे. अनेक शिक्षक संघटनांनी या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, दीर्घकाळ सेवा दिलेल्या शिक्षकांना अशा प्रकारे परीक्षा द्यायला लावणे अन्यायकारक आहे. तसेच, फक्त दोनच संधी देण्यात आल्याने शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काही संघटनांनी या निर्णयावर पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे.

आता शासन त्यावर धोरण ठरवणार आहे. त्यानुसार परीक्षेचे वेळापत्रक, अभ्यासक्रम आणि मार्गदर्शक सूचना दिल्या जातील. परंतु शिक्षकांना भीती आहे की, वय झाल्यामुळे अभ्यास पुन्हा करणे कठीण जाईल. यामुळे अनेकांना सक्तीची सेवानिवृत्ती घ्यावी लागू शकते. अनेक शिक्षकांनी २५-३० वर्षे सेवा करून आता फक्त काहीच वर्षे निवृत्तीपर्यंत उरली आहेत. त्यांच्या मते, इतक्या वर्षांच्या अनुभवाकडे दुर्लक्ष करून अचानक परीक्षा लावणे अन्यायकारक आहे. शिक्षक संघटनांचा दावा आहे की, अनुभव आणि अध्यापन कौशल्यालाच महत्त्व द्यावे, केवळ टीईटीला नाही.

सरकार आणि सर्वोच्च न्यायालयाचे म्हणणे आहे की, या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगले शिक्षण मिळेल. प्रत्येक शिक्षकाला पात्रता सिद्ध करावी लागेल. त्यामुळे भविष्यात शिक्षणाची पातळी उंचावेल. परंतु दुसरीकडे, अनुभवी शिक्षक नापास झाल्यास त्यांच्या जागी कमी अनुभव असलेले शिक्षक प्रमुख होतील, हा एक वेगळा धोका आहे. एकीकडे शिक्षणाची गुणवत्ता वाढेल, पण दुसरीकडे वृद्ध शिक्षकांसाठी ही परीक्षा मोठं आवाहन ठरणार आहे. शासनाने याबाबत संतुलित निर्णय घेणे आणि शिक्षकांना योग्य मदत उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**शब्दस्पर्शी- सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९**

## पान १ वरुन

### महावीर चौकात ...

निषेध करू आणि कुणालाही माफ करणार नाही. शेवटी, प्रशासनाचे आम्ही आभार मानतो. पण आमची भाषा समजत नसेल, तर यानंतर त्यांना त्यांचीच भाषा ऐकवावी लागेल.

जैन समाजाने दिलेल्या निवेदनात स्पष्टपणे नमूद केले आहे की, सदर कृती भारतीय न्याय संहिता (इछ्ड) कलम २९९ व ३९८ अंतर्गत दंडनीय आहे. त्यामुळे संबंधित दोषींविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, प्रशासनाकडे महावीर चौकातून हिरवा झेंडा तात्काळ काढण्याची, भविष्यात अशा घटनांना आळा घालण्यासाठी परिसरात नियमित प्रशासकीय देखरेख व सुरक्षा उपाययोजना वाढवण्याची, तसेच महावीर चौकाचे स्वच्छता, सौंदर्यीकरण व योग्य देखभाल सुनिश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या घटनेमुळे जैन समाजामध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटली असून, शहरातील धार्मिक सलोखा अबाधित राहावा याकरिता प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी समाजाची अपेक्षा आहे. समाजाने स्पष्ट केले आहे की, या घटनेवर तत्काळ लक्ष न दिल्यास धार्मिक भावना दुखावल्या जाण्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो.

### आयटकच्या अंगणवाडी ...

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण फेर सर्वेक्षण व चेहरा ओळख प्रणाली, मातृत्व वंदना यासारखे काम सरकार राबवित असल्याने अंगणवाडीतील मुलांना प्राथमिक पुर्व शिक्षण दिल्या जात नसल्याने गावपातळीवर कर्मचाऱ्यांचा व पालकांचा रोष वाढत चालत असल्याने असंतोष निर्माण झाला आहे. शासनाच्या निर्णयानुसार अंगणवाडी कर्मचाऱ्यांना अंगणवाडी व्यतिरिक्त कुठलेही कामे देवू नये या निर्णयाची अंमलबजावणी करावी,तसेच गाव पातळीवर काम करत असतांना अंगणवाडी कर्मचारी गुतरात उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करून अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देवून वेतन, पेन्शन, ग्रॅज्युटी इत्यादी योजनेचा लाभ मिळावा आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी, या मागणीसाठी जिल्हा परिषदेवर मोर्चा काढण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाने जिल्हा परिषद बाल कल्याण विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती गोरे यांची भेट घेऊन त्यांना आपल्या मागणीचे निवेदन सादर केले.अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ग्रॅज्युटी लागु करावी, अंगणवाडी सेविका व मदतनीसांना वर्ग-३ व ४ चा कर्मचारी घोषित करून त्यांना त्याप्रमाणे वेतनश्रेणी, महागाई भत्ता व अन्य सर्व भत्ते ग्रॅज्युटी, भविष्यनिर्वाह निधी,मासिक पेन्शन इत्यादी सामाजिक सुरक्षा लागू करावा, अंगणवाडी केंद्रातील एफआरएसची कामे मोबाईल अभावी होत नसल्याने बंद करावे, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेमध्ये कुटूंबातील फेर सर्वेक्षणाचे काम इतर योजनेकडून करून घेण्यात यावेत,अंगणवाडीमध्ये येत असलेला टीएचआर आहार निकृष्ट दर्जाचा असल्याने ताजा सकज आहार शासनाने पुरवावा आदी मागण्यांचा या निवेदनात समावेश आहे.

या मोर्चात उषा मगरे,सविता देशमुख, नंदा शिंदे, संगिता इंगळे,सागर वाढेकर, सुरेखा भानापुरे,अरूणा इरशे, अनिता रानमाळ,अनिता पिंपळे, जुगनाबी चाऊस,शोभा तौर, ताई नरवडे, गीता बावसकर, अल्का पुरी, अश्विनी कुलकर्णी, मंगला पगारे, अर्चना जाधव, छायाबाई थोटे, वनमाला पवार, निर्मला देशमुख, पद्मछाया वनगुजरे, अनिता पगारे यांच्यासह जालना जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

### ३१ ग्रामपंचायतींच्या ...

करून जबाबदारी निश्चित करावी. दोषींवर शिस्तभंगाची कठोर कारवाई करावी.

बाळासाहेब खवणे यांनी प्रशासनाला अल्टिमेटम देत स्पष्ट इशारा दिला की, पाच वेळा निवेदन देऊनही उत्तर दिलं नाही. आता जनतेला फसवणं थांबवा! अहवाल लपवला तर पंचायत समिती दणाणून सोडू. येत्या १५ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता पंचायत समिती कार्यालय, मंठा येथे संभाजी ब्रिगेड रणसंग्राम उभारेल. या आंदोलनातून उद्भवणाऱ्या कायदेशीर, प्रशासकीय व सामाजिक परिणामांची संपूर्ण जबाबदारी गटविकास अधिकाऱ्यांवर राहील.

### अकोला देव ...

यांनी यावेळी सांगितले. सदरील लांडगे हे ऊसाच्या शेतात लपून हल्ला करत असून या मुळे अजूनही शेतकरी भयभीत असून यांचा काही तरी उपाय योजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

## वाचकांचे मनोगत

### कोकणातील घरे झाली मंदिरे,घरांना आले उत्सवाचे स्वरूप

कोकणातील गणेशोत्सवात कोकणाला जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले आहे. नोकरी - व्यवसाया निमित्त कोकण बाहेर असलेले ग्रामस्थ आपल्या कुटुंबासह आपल्या मूळ गावातील घरात आवर्जून येतात. वर्षभर बंद असलेली घरे गजबजून जातात. घराच्या साफसफाई पासून गणपतीचा आरास करण्यात गुंतून जातात.गणेश चतुर्थदशी पासून अनंत चतुर्दशीपर्यंत दुपारी - रात्री गणपतीची आरती ,प्रसाद,नैवेद्य, गणपतीची पूजा यात सगळे कुटुंबासह व्यस्त असते.दररोज सांस्कृतिक कार्यक्रम, भजने,महिलांच्या फुगड्या,पुरुषांचे नाच( ,शक्तिवाले,तुरेवाले ) ढोल वादन अशा विविध कार्यक्रमाने सर्वत्र घरांना मंदिराचे स्वरूप प्राप्त होते.दिवसभरात पैयपावणे गणपतीच्या दर्शनास येतात. आतातर गणेश भक्तांच्या सेवेत राजकीय पक्षांचे नेते वाहतूक सेवा मोफत उपलब्ध करून देण्यात. कोकणातील गणेशोत्सवात वेगळेच चैतन्य निर्माण होते.गणेश विसर्जन मिरवणुकीत ढोल,तासे,लेझीम पथक यांचा समावेश असतो. गणपती बाप्पा मोरया,पुढील वर्षी लवकर या च्या घोषणांनी रस्ते दुमदुमून गेले.भक्तांची हाक ऐकून पुढील वर्षी १४ सप्टेंबर २०२६ रोजी आगमन होईल.कोकणातील गणेशोत्सवात बाजारपेठेत चांगली तेजीत होती.सर्वांना आनंद देणारा उत्सव म्हणजे गणेशोत्सव.

**महादेव गोळवसकर, कुर्ला मुंबई, ९८६९४७६२०९**
mahadeogolvaskargmail.com

स्व. दत्तात्रय हेलसकर स्मृतिदिन

# शिक्षकांनी विद्यार्थ्यात मूल्यसंस्कार जाणीवपूर्वक रुजवावेत -जमीर शेख

## महेंद्र वाकोडकर यांच्या अभिनयाने विद्यार्थी भारावले



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** - मानवी जगण्यातील संवेदना जागृत करण्यासाठी आणि माणसाला माणूस म्हणून जोपासणारा मूल्यसंस्कार हा साने गुरुजींच्या ' श्यामची आई ' या कथांमधून उमटत आहे. बालमनावर हाच मूल्यसंस्कार रुजविण्यासाठी शिक्षकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत,असा विचार साने गुरुजी कथामालेचे कार्याध्यक्ष जमीर शेख यांनी मांडला.

श्रीमती जमनाबाई बाळाराम काबरा विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयात सोमवारी ( ता.८) हेलस साने गुरुजी कथामालेचे संस्थापक अध्यक्ष स्व. दत्तात्रय हेलसकर दहाव्या स्मृतिदिन अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साने गुरुजी कथामालेचे कार्याध्यक्ष जमीर शेख हे होते. या वेळी साने गुरुजी कथामालेचे जिल्हाध्यक्ष डॉ.सुहास सदाव्रते, प्राचार्य व्ही.के.जाधव, ज्येष्ठ शिक्षक एस.बी.बोरकर, माजी प्राचार्य नंदकुमार काळे, कथामाला शाखेचे अध्यक्ष संजय निकम, संदीप इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात स्व.दत्तात्रय हेलसकर यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त अभिनेते महेंद्र वाकोडकर यांचा ' श्यामची आई ' हा नाट्य प्रयोग सादर करण्यात आला. एकपात्री नाट्य प्रयोगातून अभिनेते वाकोडकर यांनी साने गुरुजी लिखित ' श्यामची आई ' या ग्रंथातील विविध कथां सादर करीत मुलांना मंत्रमुग्ध केले. एकपात्री नाट्यप्रयोगातून 'श्यामचे पोहणे, वटसावित्रीचे व्रत' अशा सरस कथांमधून मुलांनी अनोखे भावविश्व अनुभवले.अभिनेते वाकोडकर यांच्या दमदार अभिनयाने विद्यार्थी भारावले तर कथांमधून विविध भावछटांनी कार्यक्रमात अधिक रंगत वाढली. कार्यक्रमात काही कथा सादरीकरणाने उपस्थिती विद्यार्थ्याच्या डोळ्याच्या कडा पाणावल्याचा अनुभव दिसून आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यालयातील विद्यार्थिनी आचल म्हस्के, पायल खरात,प्राची गडकर,प्राची जाधव यांनी स्वागत गीत गायले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अरुण आहेर यांनी केले. आभार राजेंद्र जगताप यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता माजी प्राचार्य नंदकुमार काळे यांनी सादर केलेल्या पसायदानाने करण्यात आली. कार्यक्रम आयोजनासाठी दिनकर ससाणे, सुनील बनसोडे,रमेश इंगळे, संजय कुलकर्णी, कैलास भूतेकर, रवींद्र मोरे यांनी प्रयत्न केले.

**संबोधीचे सूमधूर गाणे**

स्व.दत्तात्रय हेलसकर स्मृतिदिन अभिवादन कार्यक्रमात बालगायिका संबोधी संदीप इंगोले हिने ' ये मेरे वतन के लोगो ' या सादर केलेल्या देशभक्तीपर गीताने उपस्थिती भारावले. कार्यक्रमात संबोधीने गायलेल्या ' हीच आमुची प्रार्थना ' गीताला उपस्थिती विद्यार्थ्यांनी उस्फूर्त दाद दिली.

**एकपात्री नाट्य प्रयोगाचा शुभारंभ..**

हेलस साने गुरुजी कथामालेचे संस्थापक अध्यक्ष स्व.दत्तात्रय हेलसकर यांच्या स्मृतिदिनी अभिनेते महेंद्र वाकोडकर यांच्या एकपात्री नाट्यप्रयोगाची जबाबदारी साने गुरुजी कथामालेने घेतली असल्याचे सांगून 'श्यामची आई' या नाट्यप्रयोगाचा नवा शुभारंभ करण्यात आला असल्याचे साने गुरुजी कथामालेचे जिल्हाध्यक्ष डॉ.सुहास सदाव्रते यांनी सांगितले.

# अत्याधुनिक तंत्रज्ञानासह मोरया मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल सज्ज

**जालना | प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात मोरया हॉस्पीटलच्या रुपाने एक नवी आरोग्य क्रांती घडली असून केंद्रीय आयुष(स्वतंत्र प्रभार)तथा आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते मोरया मल्टी स्पेशालिटी हॉस्पीटलचे थाटात उद्घाटन करण्यात आले. जालना शहरातील डॉ. योगेश शाहुराव राठोड यांच्या मोरया मल्टिस्पेशालिटी हॉस्पीटल व विश्वम् मेडिकल चे उद्घाटन केल्यानंतर उत्तम आरोग्य सेवा आणि समर्पित भावनेतून या हॉस्पीटलच्या माध्यमातून रुग्णाला योग्य उपचार आणि सेवा मिळेल अशी सदीच्छा व्यक्त केली.

यावेळी माजी राज्यमंत्री आ. अर्जुनराव खोतकर, माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे, विधानपरिषद सदस्य राजेश राठोड, माजी आमदार सुरेश जेथलिया, अरविंदराव चव्हाण, जालना न. प. चे माजी नगराध्यक्ष भास्कर आंबेकर, जालना मार्केट कमिटीचे उपाध्यक्ष भास्कर दानवे, भाऊसाहेब घुगे, जिल्हाध्यक्ष शिवसेना, बळीराम मापारी लोणार, शिवछत्र मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर मापारी, श्री अविनाश चव्हाण, जिल्हा मेडिकल असोचे अध्यक्ष साईनाथ पवार, रजिस्ट्रार मोहन राठोड, शिवसेना नेते पंडीत भुतेकर, कर्मचारी नेते प्रवीण पवार विभागीय अध्यक्ष, म.रा.जी.प.कर्मचारी महासंघ, नितीन राठोड मंठा, अंकुश राठोड, ए.जे. बोराडे शिवसेना नेते, उद्धव पवार, प्रेमसिंग राठोड, मोहन आडे, भागवतराजे जाधव यांची उपस्थिती होती. तसेच जालना शहरातील व ग्रामीण भागातील बहुतांश डॉक्टर्स यांनी हॉस्पिटल ला भेटून शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी डॉ. योगेश शाहूराव राठोड यांच्या मोरया मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटला भेट देत त्यांच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घेतली. त्याच तंत्रज्ञानाचा वापर करून वैद्यकीय सुविधा या हॉस्पिटल मध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या हॉस्पिटलमध्ये जालना वासियांना तज्ञ व अनुभवी डॉक्टरांच्या देखरेख खाली उत्तम वैद्यकीय उपचार मिळतील असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी हॉस्पिटल चे संचालक डॉ. योगेश शाहुराव राठोड, डॉ. सौ. किरण योगेश राठोड यांनी या हॉस्पीटलच्या माध्यमातून जालनेकरांना अत्याधुनिक सुविधेसह आरोग्य सेवा उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे त्यांचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. या हॉस्पीटलमध्ये अस्थिरोग विभागाचे डॉ. अमोल साळवे, कान नाक घसा विभागाचे डॉ. अश्विनी तुपे(मावळ), मेडीसिन विभागाचे डॉ. प्रसाद गायकवाड, डॉ. अक्षय चव्हाण, युरोलॉजी विभागाचे डॉ. तुषार अग्रवाल, भुल तज्ञ डॉ. विठ्ठल शेळके, डॉ. रामेश्वर तुपे, बालरोग तज्ञ डॉ. नंदकिशोर पालवे, डॉ. उमेश राठोड, पॅथॉलॉजी विभागाचे डॉ. कैलास सचदेव हे सेवा देणार आहेत. दरम्यान या हॉस्पीटलमध्ये कॅन्सर सर्जन डॉ. अविनाश गायकवाड, न्युरोलॉजिस्ट डॉ. रोशन चव्हाण, नेफ्रोलॉजिस्ट डॉ. शालिकराम जाधव यांच्या नियमित व्हिजीट्स उपलब्ध असणार आहेत.

सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी साठी डॉ.ओंकार चव्हाण, जालना येथिल सुप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ मातृत्व हॉस्पिटल चे संचालक डॉ. सुनिल राठोड, इंजि. शिवम चव्हाण, प्रा. नंदकिशोर राठोड. प्रा. रंगनाथ खेडेकर, दत्तापूरचे सरपंच बंडू राठोड, बबनराव शेळके, संजयराजे जाधव यांनी परिश्रम घेतले.




मोरया मल्टी. हॉस्पिटल मधील उपलब्ध पुढील सुविधा उपलब्ध आहेत. त्यात **सर्जरी व अपघात विभाग** - अपेंडीक्स, हर्निया, गर्भपिशवीचे, पित्ताशयाचे विना टाक्याचे शस्त्रक्रिया व उपचार, स्तनातील गाठीचे उपचार व शस्त्रक्रिया, दुर्बिणीव्दारे (लॅप्रोस्कोपिक) विविध शस्त्रक्रिया, थायराईड ग्रंथी शस्त्रक्रिया, अन्ननलिकेची तपासणी व उपचार, स्वादुपिंडावरील विकार व उपचार, जळालेल्या रुग्णावर उपचार, सर्व प्रकारच्या मुळव्याधावर उपचार, मुळव्याधावर शस्त्रक्रिया व इंजेक्शन उपलब्ध, अपघातामध्ये डोक्याला, छातीला, पोटाला, मार लागलेल्या रुग्णावर उपचार व ऑपरेशन, मुत्रपिंड, मुत्राशय आजार निदान व उपचार, मधुमेहामुळे होणार्या जखमांवर उपचार व शस्त्रक्रिया, सर्व प्रकारच्या कॅन्सरचे निदान व उपचार

**अस्थिरोग विभाग** - २४ तास अद्यावत अपघात विभाग, हाडांच्या सर्व शस्त्रक्रिया, कृत्रिम सांधेरोपण शस्त्रक्रिया, मणक्याची शस्त्रक्रिया, दुर्बिनद्वारे सांध्यांची शस्त्रक्रिया (Arthroscopy), हाय फ्रिक्केन्सी सी आर्म, मेडीसिन विभाग, हृदय विकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, फुफूसांचे उपचार, सर्पदंश व विषबाधा उपचार, थायरॉईड, दमा, किडनीच्या आजारांचे उपचार, सांधेवात, अलर्जी, डेंगू या उपचार, अर्धांगवायु व मेंदूतील रक्तस्त्राव उपचार.

**त्वचारोग विभाग-** सर्व प्रकारच्या त्वचा, केस, नखे, मुख रोगांवर उपचार, सर्व प्रकार चे लेझर स्किन ट्रीटमेंट, चेहऱ्यावरील मुरम व व्रणांवर उपचार, चेहऱ्यावरील वांग व डागावर उपचार, केमिकल पोलिंग, लेझर हेअर रिमूव्ह, चेहरा व केस पी आर पी ट्रीटमेंट, हायड्रा फेशियल, बोटॉक्स ट्रीटमेंट, स्ट्रेचमार्क रिमूव्हल ट्रीटमेंट, हेअर ट्रान्सप्लांट,लेझर ट्रिटमेंट,पिलींग, फेशियल ग्लो ट्रिटमेंट, अन्टी एजिंग ट्रिटमेंट, **युरोसर्जरी विभाग-** किडनी स्टोन, प्रोस्टेट लेजर, **शस्त्रक्रिया उपलब्ध** - मुत्राशय व लघवीच्या पिशवीच्या, कॅन्सरचे निदान व शस्त्रक्रिया, पुरुष वंध्यत्व निवारण, कान, नाक व घशाचे सर्व रोग निदान व उपचार, कान, नाक व घशाची दुर्बीनव्दारे तपासणी, मायक्रोइयर सर्जरी (बहीरेपणा व वाहणाऱ्या कानासाठी), एंडोस्कोपी सायनस सर्जरी, वाकडे व वाढलेले नाकाची सर्जरी, ऑडियोमेट्री व श्रवण यंत्र, डोकेदुखी, अँलर्जी, नेहमीची सर्दी व चक्कर (Vertigo) वर उपचार

‘माणिक मोती’ संगीत उत्सव

# अंजली-नंदिनी गायकवाड भगिनींच्या गाण्याने जालनेकर रसिक तृप्त

**जालना | प्रतिनिधी** - ‘सावळाच रंग तुझा’, ‘क्षणभर उघड नयन देवा’ आणि ‘दिल की तपिश आज है आफताब’ यांसारख्या लोकप्रिय गाण्यांनी प्रसिद्ध गायिका अंजली आणि नंदिनी गायकवाड यांनी जालनेकर रसिकांची मने जिंकली. येथील जेईएस महाविद्यालयाच्या चुन्नीलाल गिरीलाल गोयल सभागृहात आयोजित केलेल्या 'माणिक मोती' या संगीत उत्सवाच्या निमित्ताने 'हे सुरांनो चंद्र व्हा' या सांगितिक मैफलीचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात या दोन बहिणींनी एकापेक्षा एक सरस नाट्य व भावगीते सादर करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

कलावर्धिनी जालना आणि अग्निहोत्री-सेवलीकर परिवार यांच्या वतीने कै. माणिकराव शंकरराव अग्निहोत्री यांच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती आणि कै. माणिकराव अग्निहोत्री यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम बागडिया, उपाध्यक्ष फुलचंद भक्कड, मनोरमा अग्निहोत्री, सचिव श्रीनिवास भक्कड, प्राचार्य गणेश अग्निहोत्री, डॉ. विनायक सेवलीकर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात 'पंचतुंड नर रुंडमालधर' या भक्तिगीताने झाली. त्यानंतर 'या नव नवल नयनानोत्सवा' आणि 'मन मंदिरा' या भावगीतांनी सभागृहात एक भारावलेले वातावरण निर्माण झाले. 'श्रीरंगा कमलकांता' सादर झाल्यावर रसिकांच्या टाळ्यांचा गजर अखंड सुरू होता. शाहीर कल्याण उगले यांच्या 'जीवा लागली ही आस, नाम रंगी रंगलो, होऊनी तुझा दास' या गाण्यातील कोमल आणि भावस्पर्शी स्वरांनी अनेकांच्या डोळ्यांत पाणी आले.

'दैव किती अविचारी', 'घेई छंद' आणि 'सुरत पिया की' या गीतांना प्रेक्षकांनी उत्स्फूर्त साथ दिली. 'मेरे ढोलना सुन' या लोकप्रिय गाण्यावर रसिकांनी टाळ्यांच्या गजरात भरभरून दाद दिली. 'केंव्हा तरी पहाटे' या गाण्यातील शांत स्वरांनी सभागृहात एक वेगळाच भावमय माहोल तयार केला. 'तारिणी नववसन धारिणी' या शास्त्रीय अंगाचे दर्शन घडवणाऱ्या गाण्याने कार्यक्रमाला एक वेगळीच उंची मिळाली. 'या भवनातील गीत', 'सावळाच रंग तुझा' व 'क्षणभर उघड नयन देवा' या गीतांवर रसिकही थिरकले. 'दिल की तपिश' आणि शेवटी सादर झालेल्या 'अवघा रंग एक झाला' या गाण्यांनी संपूर्ण सभागृहात आनंदाची लहर पसरवली.



या मैफलीला वाद्यवृंदाची उत्तम साथ लाभली. तबला वादक ओंकार इंगवले आणि प्रशांत थोरात, हार्मोनियम वादक अंगद गायकवाड, सिंथ वादक ओंकार उजगारे आणि ऑक्टोपॅड वादक बंटी सोज्वळ यांनी दिलेल्या सुरेल साथीनं गायनाला अधिक रंगत आणली. निवेदनाची जबाबदारी सुलभा कुलकर्णी यांनी समर्थपणे पार पाडली. या कार्यक्रमाला परभणी, नासिक, बीड, संभाजीनगर, सेवली, भोकरदन, परतूर, जिंतुर, जाफराबाद आणि शहरातील कलावर्धिनी संस्थेचे सदस्य, अग्निहोत्री-सेवलीकर परिवारातील सदस्य तसेच संगीत, कला, नाट्य, उद्योग आणि व्यापार क्षेत्रातील अनेक रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण मैफलीदरम्यान रसिकांनी दिलेल्या उत्स्फूर्त दाद आणि टाळ्यांच्या गजराने कार्यक्रम अधिकच संस्मरणीय बनला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुलभा कुलकर्णी यांनी केले, तर डॉ. सुजाता देवरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. ही मैफल जालनेकरांसाठी अविस्मरणीय ठरली, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. कल्याण उगले, डॉ. यशवंत सोनुने, डॉ. मोहिनी रायबागकर, प्रकाश कुंडलकर, डॉ. बी.जी. श्रीरामे, दिनेश संन्यासी,अजय कुलकर्णी आणि टीम कलावर्धिनी यांनी प्रयत्न केले.

# शिक्षणः प्रश्न अनेक-ऊत्तर एक; ज्ञानोबा वरवट्टे गौरवग्रंथावर नांदेड येथे परिसंवाद संपन्न!

**नांदेड | प्रतिनिधी -** मराठवाडा शिक्षक संघाचे उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे यांच्या सेवापुर्ती निमित्त प्रकाशित करण्यात आलेल्या शिक्षणः प्रश्न अनेक-ऊत्तर एक गौरव ग्रंथवर नांदेड येथे परिसंवाद संपन्न झाला. शिक्षण क्षेत्रातील अरिष्ट हे केवळ या क्षेत्रातील नसून

शिक्षण, रोजगार व आर्थिक विकास यांच्या तुटलेल्या सांध्यातील असल्याचे प्रतिपादन कॉम्रेड अजित अभ्यंकर यांनी केले.

पीपल्स कॉलेज नांदेडच्या नरहर कुरुंदकर सभागृहात संपन्न झालेल्या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी सूर्यकांत विश्वासराव होते. कामगार नेते कॉम्रेड अजित अभ्यंकर आणि राजकीय विश्लेषक प्रा अशोक सिध्देवाड भाष्यकार तर मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम, पुस्तकाचे संपादक प्रो डॉ. मारोती तेगमपुरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष व्यंकटराव चिलवरवार यांनी केले. एका तासाच्या आपल्या भाषणात अभ्यंकर यांनी शिक्षण क्षेत्रातील भयाण वास्तवाचा उहापोह केला. देशात बेरोजगारीचा दर ८% ते ९% असून त्यामधे शिक्षित बेरोजगारांचे प्रमाण जास्त असून ही बाब असल्याचे चिंताजनक अभ्यंकर म्हणाले. कायम कर्मचाऱ्यांची संख्या कमी कमी होत आहे. राज्य सरकारच्या विविध अस्थापनेत सुमारे अडीच लाख पदे रिक्त असून ऐंशी टक्के कर्मचारी कंत्राटी पध्दतीने भरती करण्यात आले आहेत. प्रगत देशात सरकारी कर्मचाऱ्यांची संख्या लोकसंख्येच्या प्रमाणात सात ते तीस टक्के असून आपल्या देशात हे प्रमाण दिड टक्क्यापेक्षा थोडे जास्त असल्याचे सांगून देशात क्रॉनी कॅपिटलिजम तर आहेच परंतु देशाचे सरकारच क्रॉनी असल्याचे ते म्हणाले. प्रसिद्ध राजकीय विश्लेषक प्रा अशोक सिध्देवाड परिसंवादात भूमिका मांडताना म्हणाले की, ब्रिटिश देशातून जाणे म्हणजे स्वातंत्र्य नव्हे तर देशातील सर्व नागरिकांना विकासाच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत. शिक्षण, आरोग्य सुविधा पुरविणे सरकारची जिम्मेदारी असताना आपल्या देशातील सरकार मात्र आपल्या या घटनादत्त जिम्मेदारी पासून पळ काढत आहे. यावेळी मराठवाडा शिक्षक संघाचे सरचिटणीस राजकुमार कदम, उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे आणि पुस्तकाचे संपादक प्रो डॉ. मारोती तेगमपुरे यांची समयोचित भाषणे झाली. सूर्यकांत विश्वासराव यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन आनंद कर्णे यांनी केले.

# क्रिकेट स्पर्धेत जालन्याच्या तृप्ती कोठारी आणि अर्चना झंवर यांची चमकदार कामगिरी

## ईन्नरव्हील क्लब क्रिकेट लीग स्पर्धेत वेस्ट झोनला विजेतेपद




**जालना | प्रतिनिधी -** हैदराबाद येथे ३१ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरदरम्यान रंगलेल्या ईन्नरव्हील क्लब क्रिकेट लीग स्पर्धेत जालन्याच्या वेस्ट झोनने विजेतेपद मिळवत इतिहास रचला. या विजय संघातील जालन्याच्या अष्टपैलू खेळाडू तृप्ती प्रसन्ना कोठारी आणि फलंदाज अर्चना झंवर यांनी चमकदार कामगिरी करून राष्ट्रीय पातळीवर जालना शहराचा ठसा उमटविला तर जालना येथील मूळ रहिवासी आणि पुणे येथे स्थायिक झालेल्या पूजा भवर ह्या बेस्ट प्लेयर पुरस्काराच्या मानकरी ठरल्या.

तृप्ती कोठारी यांनी आतापर्यंत जिल्हा, विभागीय, राज्यस्तरावरील सुमारे ४६ लीग आणि चॅम्पियनशिप क्रिकेट स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविलेला असून, अनेक ट्रॉफी प्राप्त केल्या आहेत. हैदराबाद येथे पार पडलेल्या राष्ट्रीय स्पर्धेत प्रत्येक सामन्यात तृप्ती कोठारी यांनी सलामीला येऊन षटकार आणि चौकार मारत उत्कृष्ट खेळी केली. तृप्ती कोठारी आणि पूजा भवर यांनी उपांत्यपूर्व आणि अंतिम सामन्यात प्रत्येकी २७ आणि २४ धावांचे दिलेले योगदान संघाच्या विजयासाठी निर्णायक ठरले. जालन्याच्याच अर्चना झंवर या उत्कृष्ट फलंदाज असून, त्यांनी धडाकेबाज फलंदाजी करून संघाची धावसंख्या रचण्यात मोठा हातभार लावला. भारतातील ईस्ट, वेस्ट, नॉर्थ आणि साउथ या चार भागातून आलेल्या संघांमध्ये कडवी स्पर्धा रंगली होती. वेस्ट झोनने संघभावना, कौशल्य आणि चिकाटीच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर मात केली आणि राष्ट्रीय स्तरावर वेस्ट झोनचे निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. अष्टपैलू खेळाडू तृप्ती कोठारी म्हणाल्या की, आमच्या संघाने मिळवलेलं हे विजेतेपद केवळ आमच्या खेळाचा नाही तर महिलांच्या आत्मविश्वासाचा विजय आहे. सुरुवातीपासून शेवटपर्यंत आम्ही संघभावनेने खेळलो आणि एकमेकांचा आधार बनलो. ही संधी मिळाली याचा मला अभिमान आहे. भविष्यात अधिकाधिक महिला मैदानावर उतरून आपलं कौशल्य दाखवतील, अशी आशा आहे.अर्चना झंवर म्हणाल्या की, या स्पर्धेत खेळताना आम्हाला स्वतःवर आणि संघावर विश्वास ठेवायला शिकायला मिळालं. प्रत्येक चेंडूवर, प्रत्येक धावावर आम्ही लढलो आणि विजयाचा आनंद साजरा केला. महिलांसाठी अशी व्यासपीठं तयार झाली पाहिजेत. आम्ही पुढेही अशा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन इतरांना प्रेरणा देऊ.

बक्षीस वितरण समारंभाला भारताचे महान माजी क्रिकेटपटू मोहम्मद अझहरुद्दीन यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच ईन्नरव्हीलच्या जागतिक अध्यक्ष के. मोरलँड, त्यांचे सहकारी टेरेन्स पोलॉक, राष्ट्रीय अध्यक्ष ज्योती माहिपाल, सचिव स्वर्णलता तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते. नयन मोंगिया आणि हरभजन सिंग यांचे संदेश, खेळाडूंचे प्रेरणादायक व्हिडिओ, प्रोजेक्ट्स, कमेंट्री आणि गाला नाईट यामुळे कार्यक्रम संस्मरणीय ठरला. वेस्ट झोनने मिळवलेलं हे विजेतेपद क्लबच्या इतिहासातील एक नवा टप्पा ठरला असून, महिलांच्या क्रीडा सहभागाला नवी दिशा मिळवून देणारा हा प्रेरणादायी क्षण आहे.

या क्रिकेट स्पर्धेसाठी प्रांतपाल के. स्वर्णलता, संयोजक माजी प्रांतपाल नैना देसाई, विनिता हरंथका, सहसंयोजिका सीमा कुमार, नॅशनल कोऑर्डिनेटर पूजा अग्रवाल, खुशबू बिहानी, झोनल समन्वयक अरुणाश्री गुडला, जयश्री अमीपारा, सुरुची सक्सेना आणि जयश्री सागर यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले.

# जाफराबाद तालुक्यातील गुणवंत विद्यार्थ्यांना तेली सेना गुणवंत विद्यार्थी पुरस्कार प्रदान



**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** तेली सेना गुणवंत विद्यार्थी आणि समाजभूषण पुरस्कार संभाजीनगर येथे आयोजित झालेल्या कार्यक्रमांमध्ये जाफराबाद तालुक्यातील गुणवंत विद्यार्थी वैष्णवी दामोदर साळवे, गायत्री नंदकिशोर साळवे, श्रुती श्रीरंग साळवे, विनायक रवी टोम्पे,ओमकार रवी टोम्पे, पूजा ज्ञानेश्वर दांडयत,भाग्यश्री विठ्ठल डोंमळे यांचा गुणवंत विद्यार्थी म्हणून सत्कार करण्यात आला अँड वैष्णवी सूर्यकांत साळवे, रवी भिकाजी टोंपे यांचा समाज भूषण पुरस्कार २०२५ तेली सेना संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला त्यावेळेस गणेश पवार, ह.भ.प जान्हवी ताई मिसाळ , बोरसे महाराज सूर्यकांत साळवे,सुनील साळवे, उषा सूर्यकांत साळवे, रेखा टोम्पे, श्रीरंग साळवे,नंदकिशोर साळवे,गणेश भवर इत्यादी उपस्थित होते.

# सिटू प्रणित शालेय पोषण आहार कामगार संघटनेचे चौथे जालना जिल्हा अधिवेशन संपन्न

## शालेय कामगारांना किमान वेतन २६००० रु यासह अनेक ठराव




**जालना । प्रतिनिधी -** सिटू सलग्न जालना जिल्हा शालेय पोषण आहार कामगार संघटनेचे चौथे जिल्हा अधिवेशन दिनांक सात सप्टेंबर २०२४ रोजी सिटू भवन, संजय नगर, जालना येथे आयोजित करण्यात आले होते.

या अधिवेशनाला उद्घाटक म्हणून ज्येष्ठ कामगार नेते कॉम्रेड अण्णा सावंत यांची उपस्थिती होती. अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष कॉम्रेड मधुकर मोकळे होते.

शालेय कामगार हा सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे दुर्लक्षित राहिलेला असून सरकार या कामगारांना जाणीवपूर्वक विकासाच्या परीघाबाहेर ठेवत आहे.

सगळ्यात कमी मानधनावर काम करणारा शालेय कामगार असून या कामगाराने देशातील विद्यार्थ्यांमधील कुपोषण कमी करण्याचे काम केले, सुदृढ भारत घडवण्याचे काम केले मात्र शालेय कामगार मात्र कुपोषित होण्याची वेळ या सरकारने आणली आहे. असे अण्णा सावंत बोलताना म्हणाले.

या अधिवेशनात संघटनेचे जन. सेक्रेटरी ड.अनिल मिसाळ यांनी मागील तीन वर्षाचा अहवाल प्रतिनिधी समोर मांडला या अहवाला वर सविस्तर चर्चा करून प्रतिनिधींनी आपले मत व्यक्त केले. गावाला उत्तर देताना शालेय कामगारांची एकजूट वाढवून येत्या काळामध्ये शालेय कामगारांना संघटितपणे सरकारच्या विरोधात लढा तीव्र करावा लागेल त्याचबरोबर आपला कामगार विखुरलेला असल्यामुळे सरकार आपल्याकडे दुर्लक्ष करीत आहे. शालेय कामगारांकडे दुर्लक्ष करून सरकार शैक्षणिक क्षेत्रात सुद्धा भांडवलदार दर्जेने धोरण राबवून देशाला पुन्हा कुपोषणाकडे वळवण्याचा प्रयत्न करत आहेत म्हणून कामगारांनी एकजुटीने या विधान संघर्ष करून आपला रोजगार आबादी ठेवण्याबरोबरच देशाचे भविष्य देखील यामध्ये ठेवलं पाहिजे . असे जन.सेक्रेटरी ड.अनिल मिसाळ म्हणाले. शालेय कामगारांना किमान वेतन २६००० द्या., शालेय कामगारांना तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्या, शालेय कामगारांना काम करताना आवश्यक साधनसामग्री व सुरक्षा साधने द्या व कामगारांना विमा लागू करा., शालेय कामगारांना पेन्शन, ग्रॅच्युइटी व इतर सुख सुविधा लागू करा. इत्यादींसह अनेक ठराव घेण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन बाबासाहेब पाटोळे यांनी केले तर यावेळी शेषराव कान्हेरे, सुधाकर छडीदार,अशोक साळवे, गोविंद चांदगुडे, मीरा पुंगळे, चंपाबाई दाभाडे, लता वीर, सरस्वती मगर नंदाबाई बनगया, प्रतिभा आहेर, सावित्रा इस्थापे, उषा काकडे कमल पिठोरे, योगेश पुसे,संगीता पवार, सुशीला काकडे,सुनीता चौधरी,सुनीता मगर,प्रयागबाई चव्हाण, शकुंतला कांबळे, सीता साठे यांच्यासह अनेक कामगारांची उपस्थिती होती.

# कंत्राटी कामगार धोरण शिक्षण क्षेत्रासाठी हानिकारक- प्रा.डॉ.राहुल म्हस्के

## सिद्धार्थ महाविद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी

**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** येथील सिल्लोड शिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर संचलित सिद्धार्थ कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शिक्षक दिनाचे औचित्य साधून डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती व सिल्लोड शिक्षण संस्थेचे सचिव प्रा.डॉ.राहुलभाऊ म्हस्के यांना डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर अंतर्गत संगणक शास्त्र विषयात पीएच.डी. पदवी संपादन केल्याबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.दादासाहेब म्हस्के यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश देशमुख हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते तर प्रमुख वक्ते म्हणून प्रो.डॉ.विजय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.यावेळी विचारपीठावर सिल्लोड शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. दादासाहेब म्हस्के, सचिव प्रा.डॉ.राहुल भाऊ म्हस्के, प्रा.साहेबराव गायकवाड, महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रो. डॉ. सुनील मेढे, उपप्राचार्य प्रा.डॉ. एस. के. सर्जे,कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.विनोद हिवराळे, न्यू हायस्कूलचे मुख्याध्यापक रमेश मुरकुटे, प्रा. वाल्मीक वाघ , प्रा.दांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मूल्य शिक्षण व सांस्कृतिक समिती प्रमुख प्रो.डॉ.संतोष पहारे यांनी केले .यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी वैभव देवरे,रजनी चव्हाण,आदित्य साळवे, रेणुका सगट,साक्षी साबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रमुख वक्ते प्रो. डॉ.विजय पाटील यांनी डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्यावर सखोल प्रकाश टाकून आधुनिक शिक्षण पद्धतीवरही भाष्य केले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश देशमुख यांनी शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांना संबोधन केले. प्रा.डॉ. राहुलभाऊ म्हस्के यांना पीएच.डी.पदवी प्राप्त झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. दादासाहेब म्हस्के यांच्या शुभ हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.सत्काराला उत्तर देताना प्रा.डॉ.राहुल भाऊ म्हस्के यांनी सध्याच्या शिक्षण पद्धतीमध्ये कंत्राटी कामगार धोरण हे शिक्षण क्षेत्रासाठी कसे हानिकारक आहे यावर आपले अभ्यासपूर्ण मत मांडले तसेच विनाअनुदान धोरण आणि नवीन शैक्षणिक धोरण २०२० यावर देखील भाष्य केले. संस्थेचे अध्यक्ष मा.दादासाहेब म्हस्के यांनी आपल्या भाषणात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकल्याने विद्यार्थ्यांचे कौतुक केले तसेच प्राध्यापकांनी शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदवी संपादन करून गोरगरीब विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबरोबर सामाजिक ज्ञान सुद्धा द्यावे असे आवाहन केले.




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एस. एम.पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. सरिता मनियार यांनी मानले. कार्यक्रमास वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी, मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# 'श्री गणेशा आरोग्याचा' उपक्रमातून आतापर्यंत ३.२६ लाख नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी

**जालना । प्रतिनिधी -** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कल्पनेतून राबविण्यात आलेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये २८ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दरम्यान ७१५९ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांतून तब्बल ३ लाख २६ हजार नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने आणि विविध आरोग्य संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे लाखो नागरिकांपर्यंत मोफत आरोग्यसेवेचा लाभ पोहोचला.

तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या ९,९६० रुग्णांना तज्ज्ञांकडे पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले. तसेच, नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक जबाबदारी पार पाडली असून ९५ रक्तदान शिबिरांतून एकूण ६,८६२ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या अभियानात मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये तसेच धर्मादाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. राज्यभरातील मोठ्या संख्येतील गणेश मंडळांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त सहकार्य करून लोकाभिमुख उपक्रम अधिक परिणामकारक करण्यास हातभार लावला.


२८ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२५ दरम्यान 'श्रीगणेशा आरोग्याचा' अभियानात मोफत आरोग्यसेवा

महाराष्ट्रातील ३.२६ लाख नागरिकांनी मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला असून, ६,८६२ दात्यांनी रक्तदान करून समाजासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

गणेशोत्सवासारख्या सणाच्या पार्श्वभूमीवर आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कल्पना प्रत्यक्ष उतरविण्यात आली. 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमातून हजारो नागरिकांना त्यांच्या आरोग्याची मोफत तपासणी करण्याची संधी मिळाली. तपासणीदरम्यान आढळलेल्या रुग्णांना पुढील मोफत उपचारही दिले जाणार असल्याचे श्री. रामेश्वर नाईक, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख यांनी कळविले आहे.

## भाजपा जालना महानगर तर्फे गणेश मंडळाचे स्वागत

# त्यांचा सन्मान म्हणजे संस्कृतीचा गौरव - भास्कर दानवे



**जालना । प्रतिनिधी -** भाजपा जालना महानगर तर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गणेश मंडळ स्वागत सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. शहरातील सर्व गणेश मंडळांचे पुष्पहार व श्रीफळ देऊन स्वागत करून मंडळांचा सन्मान करण्यात आला. शनिवार, दिनांक ०६ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता छत्रपती संभाजीराजे उद्यान (मोतीबाग), जालना येथे हा सोहळा पार पडला.

जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, परंपरेचा वारसा पुढे नेण्याचे कार्य गणेश मंडळे करत आहेत. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नसून समाजातील ऐक्य, बंधुता आणि सामाजिक एकजुटीचे प्रतीक आहे. गणेश मंडळांच्या माध्यमातून तरुण पिढीमध्ये संस्कार, शिस्त व समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा निर्माण होत असते. त्यामुळे मंडळांचा सन्मान करणे म्हणजे आपल्या संस्कृतीचा गौरव करणे होय असे त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, प्रदेश निमंत्रित सदस्य, राजेश राऊत, मंडळ अध्यक्ष महेश निकम, धनराज काबलिये, ज्ञानेश्वर ढोबळे, शशिकांत घुगे, सुनील राठी, राजेंद्र भोसले, सिद्धिविनायक मुळे, वसंत शिंदे, सुनील पवार, शिवराज जाधव, संध्याताई देठे, वैशाली बनसोडे, पुष्पा मेहेत्रे, मनोज बिडकर, जगदीश येनगुपटला, राजू गवई, देविदास देशमुख, गोवर्धन कोल्हे, मनोज इंगळे, तुकाराम बखळे, कैलास उबाळे, सुदर्शन काळे, शाम उगले, निलेश गवळी, अनिल यशवंते, दौलत भुतेकर, आदींसह उपस्थिती होती.

# जिल्हा निवड चाचणी स्पर्धा संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र कराटे असोसिएशन तर्फे आयोजित ४६ वी राज्यस्तरीय कराटे स्पर्धा संभाजीनगर ( औरंगाबाद) येथे होत आहे करिता जालना जिल्हा निवड चाचणी स्पर्धा दिनांक दिनांक ०७ सप्टेंबर रविवारी रोजी श्री. म. स्था जैन प्राथमिक विद्यालय मैदान जालना येथे घेण्यात आली. या स्पर्धेचे अध्यक्ष गोवर्धन अग्रवाल व प्रमुख पाहुणे म्हणून बाबूलाल यादव, गणेश श्रीराम हे उपस्थित होते.

जे विद्यार्थी राज्यस्तरीसाठी निवड झालेल्या त्यांची यादी खालील प्रमाणे आहे

काता मुली यात कु. स्नेहा काळुंके,कु.निवांशी वल्लकट्टी,कु. ध्रुवी मुथा,कु. आराध्या खत्ती, कु समीक्षा कर्रे,कु. आराध्या मारावार,कु. आरुषी वलकट्टी कु. तन्वी खरटमल, कु. अनुष्का म्हेत्रे, कु. तृप्ती उपरे,कु. पूर्वा माने, कु. अश्विनी आजगे

काता मुले यात ऋषिकेश श्रीराम, रुद्र लुटे, यशवर्धन चिल्का, मल्हार पातुरकर, ईशान्य कोठारी, समर्थ डहाळे, प्रद्युमन मालपाणी, देवेंद्र चिंचपुरे, राजवीर चौहान, मोहन झुंजुर, शेलमॉन गुडेकर, नयन गोमती वाले

कुमिते मुली यात कु. स्नेहा काळुंके,कु. ध्रुवी मुथा,कु. निवांशी वलकट्टी, कु. समीक्षा कर्रे, कु. आराध्या खत्ती, कु. आराध्या मारावार, कु. तन्वी खरटमल, कु. आरुषी वलकट्टी, कु. अनुष्का म्हेत्रे, कु. तृप्ती उपरे, कु. वैष्णवी लोखंडे, कु. वैष्णवी लुटे, कु. दिव्यता कोठारी, कु. अश्विनी आजगे,कु. लावण्य गुडला

कुमिते मुले यात ऋषिकेश श्रीराम, रुद्र लुटे, समर्थ डहाळे, मल्हार पातुरकर, यशवर्धन चिल्का, ईशान्य कोठारी, ईशांत रिडला, अजित साळवे, मोहन झुंजुर, देवेंद्र चिंचपुरे, आदर्श गायकवाड, प्रद्युमन मालपाणी, राजवीर चौहान, देवेश कर्रे, शेलमॉन गुडेकर, नयन गोमती वाले तसेच कु.




आकाशी खर्डेकर, व ओंकार गुट्टे यांनी चांगले प्रदर्शन केले.

विद्यार्थ्यांना सेन्साई रुपेन्द्र गोपाल पारचा व सेन्साई अमन रुपेन्द्र पारचा यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या स्पर्धेला यशस्वी करण्याकरिता सेन्साई रुपेन्द्र पारचा, सेन्साई अमन पारचा, सेन्साई प्रेम गुल्लापल्ली, सेन्साई शुभम नागरे व अश्विनी आजगे यांनी पंचांचे काम पाहिले.

या स्पर्धेत यशस्वी झालेल्या खेळाडूंना महावीर ढक्का, जालना जिल्हा चे क्रीडा अधिकारी (DSO) संजय गाढवे, राजेश राऊत, संजय भगत, रितेश अग्रवाल, श्री. म. स्था जैन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री वानगोता, श्री. म. स्था जैन प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पोरवाल, नारायणा ई टेक्नो स्कूलची मुख्याध्यापिका श्रीमती अर्चना पवार, नारायणा ई टेक्नो स्कूलचे डीन व्यंकटराजू गुडला, सचिन खर्डेकर, प्रशांत प्रेमभारती, रितेश जयस्वाल, गणेश चिप्पा व पालक वर्ग यांनी कौतुक करून पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.